IMPACT FACTOR 5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL

Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal

Special Issue : Volume -9 : Issue-1 (March-2023)

ISSN 2455-4375

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि विकास

**डॉ. फारुकी मोहम्मद खाय्युम मो.यूनुस**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

मिल्लिया कला, विज्ञान व् व्वास्थापन शास्त्र महाविद्यालय

बीड.

---

**प्रस्तावना**:-

स्वातंत्र्यापूर्वी साधारण २०० वर्षे भारत ब्रिटिशांच्या आणि त्यापूर्वी अनेक शतके अन्य राजवटींच्या गुलामगिरीत असल्याने स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करू शकला नव्हता. आधुनिक अर्थाने स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून भारताचे अस्तित्व १९४७ सालापासून सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर देशाची अखंडता, एकात्मता, सुरक्षितता सुनिश्चित करणे हे कोणत्याही केंद्रीय शासनव्यवस्थेचे आद्य कर्तव्य. त्यानंतर नागरिकांच्या मूलभूत भौतिक गरजा भागवून त्यांना सर्वांगीण विकासासाठी सुयोग्य भवतालाची निर्मिती करणे गरजेचे ठरते. परराष्ट्रीय धोरणासंबंधी भारताने सतत अलिप्ततावादाचा पुरस्कारकेला आहे. १९७७ नंतर सत्तारूढ झालेल्या जनता पक्षानेही खरी खुरी अल्लिप्तता हेच आपले धोरण राहील, असे जाहीर केले आहे. ढोबळमानाने अलिप्तता याचा अर्थ कोणत्याही सैनिकी गटात सामील न होता, प्रत्येक आंतरराष्ट्रीय प्रश्नावर स्वतंत्रपणे निर्णय घेणे, असा केला जातो.1)

स्वातंत्र्यानंतर सलग १७ वर्षे जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधानपद आणि परराष्ट्र व्यवहार सांभाळले. एकीकडे स्वतंत्र भारतात पायाभूत सोयी-सुविधा आणि संस्था निर्माण करून त्या बळकट करण्याचे श्रेय नेहरूंना जाते. पण परराष्ट्र व्यवहाराच्या बाबतीत हा काळ विरोधाभासांचा होता. स्वातंत्र्य चळवळीवर महात्मा गांधी यांचा बराचसा पगडा असल्याने त्यावेळी आणि त्यानंतरच्या काळात भारतीय नेतृत्वावर शांतता, सहिष्णुता, अहिंसा, नीतीमत्ता या आदर्शवादी कल्पनांचा अतिरेकी प्रभाव होता. त्यामुळे नेहरूंनीही शांतता आणि नीतीमत्ता या तत्वांचा परराष्ट्र धोरणात अनाठायी वापर केला. त्याने वास्तवाकडे दुर्लक्ष झाले.

सोव्हिएत युनियनचे १९९१च्या दरम्यान अचानक विघटन झाले आणि भारतीय परराष्ट्र धोरणकर्त्यांपुढे पेचप्रसंग निर्माण झाला. भारताने १९७१ साली रशियाच्या गटात जाणे आणि १९७४ साली अणुचाचणी घेणे अमेरिकेला रुचले नव्हते आणि त्यांनी लादलेले निर्बंध अद्याप पुरते हटले होते. रशियासारखा मित्र कोसळला होता. देशाची परकीय गंगाजळी संपत आल्याने नाईलाजास्तव १९९१ साली मिश्र अर्थव्यवस्था सोडून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारावी लागली होती. खनिज तेलासाठी अवलंबून असलेल्या आखाती देशांत इराक-कुवेत युद्धामुळे अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत भारताला आधार वाटला तो आग्नेय आशियाई देशांचा. इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर आदी देश वेगाने प्रगती करत 'एशियन टायगर्स' म्हणून नाव कमावत होते. भारताने आपला रोख या देशांच्या 'आसिआन' या संघटनेकडे वळवला आणि 'लुक ईस्ट पॉलिसी' (पूर्वाभिमुख धोरण) राबवण्यास सुरुवात केली.2)

**उद्दिष्टे**:-

- परराष्ट्र धोरण हे मूलत: आर्थिक-व्यापारी आणि संरक्षणविषयक हितसंबंधांतून आकाराला अणने.

- भारत आता जे निर्णय घेतो त्यावर त्याचे बऱ्याच अंशी भवितव्य अवलंबून असणार याची चिंता करने.
- आदर्शवादी संकल्पनांच्या जोखडातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तवाची कास धरणे

**महत्व:-**

भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौहार्दाचे संबंध होते. पण ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधामध्ये बदल झाला. भारताच्या परराष्ट्र धोरणाची स्थूल जडणघडण स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली. ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील धुरिणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्त्वांवर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत देशाच्या परराष्ट्र धोरणनिर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो

कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण त्या देशाचे हितसंबंध काय आहेत व उद्दिष्टे काय आहेत यावर ठरत असते. याखेरीज आंतरराष्ट्रीय परिस्थितीप्रमाणे व देशाच्या शक्तीप्रमाणेही हे धोरण ठरते. भूराजकीय व सामरिक बाबी कायम राहत असल्यामुळे काही हितसंबंध व उद्दिष्टे फारशी बदलत नाहीत. पण धोरण निश्चिती करणारे नेतृत्व त्याच्या विचारांप्रमाणे उद्दिष्टे व ती गाठण्याच्या प्रक्रियेत बदल करू शकत असल्याने परराष्ट्र धोरणात कमीअधिक बदल होऊ शकतो.

**संबंध सुधारण्याच्या मर्यादा:-**

अमेरिकेबरोबरचे भारताचे संबंध गेल्या दहा वर्षांपासून सुधारत आहेत. त्यापूर्वी ते कायम खालीवर होत असत. परंतु हे संबंध सुधारण्याच्या मर्यादाही गेल्या काही वर्षांत स्पष्ट झाल्या आहेत. भारताने अमेरिकेबरोबर आण्विक करार करून आणि दोन्ही देशांमधील सैनिकी सहकार्य वाढवून हिंदी महासागर आणि पॅसिफिक या क्षेत्रात चीनला रोखण्यासाठी एकत्र येऊन हे संबंध बरेच सुधारले आहेत. पण भारताला चीनबरोबर स्पर्धेबरोबरच सहकार्यही हवे आहे. अमेरिका-चीन संबंधातील व्यापारयुद्धाचा फटका भारत-चीन संबंधांना बसण्याचे लक्षण आहे. चीनमधून आपण मोठ्या प्रमाणात आयात करतो तसेच निर्यातही वाढवण्याचे आपले प्रयत्न आहेत. पण अमेरिकेबरोबरचे संबंध राखताना चीनबरोबरच्या सहकार्याला मर्यादा येऊ शकतात.3)

**दहशतवदला फटका बसला:**

अमेरिकेने आपले तेलासंबंधीचे मध्यपूर्वेतील राष्ट्रांवरील अवलंबन कमी करत आणल्यामुळे तेथील राजकारणातून माघार घेणे व दीर्घकाळ तिथे गुंतून पडलेल्या अमेरिकी सैनिकांना परत आणणे हे ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारातही आश्वासन दिले होते. हे करत असताना या भागातील इसिस (इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया) या अतिरेकी संघटनेचा जोर काही प्रमाणात संपला असला तरी अफगाणिस्तानातील तालिबानबाबत असे म्हणता येत नाही.

अमेरिकेने तालिबान्यांबरोबर एकदा चर्चा केली. पण अफगाणिस्तानातील सरकारला अमेरिकेच्या मदतीशिवाय तालिबान्यांना आवरणे कितपत शक्य आहे, याबाबत तज्ज्ञांमध्ये साशंकता आहे. अमेरिकेची ही सैन्य माघार अशा परिस्थितीत भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते. कारण त्यामुळे अमेरिका पाकिस्तानलाच परत

शस्त्रास्त्रे देऊन दहशतवादाला पायबंद घालायला सांगेल व भारताच्या पाकिस्तानसंबंधी परराष्ट्र धोरणालाही धक्का बसू शकेल. दहशतवादाचा धोका आणखी वाढेल हेही शक्य आहे. या परिस्थितीत भारताला अतिशय सावधपणे आपले परराष्ट्र धोरण आखावे लागेल. एकाच वेळी अनेक बाबींकडे लक्ष ठेवावे लागेल व ही तारेवरची कसरत ठरेल.4)

**भारत एक प्रभावी सत्ता बनत आहे:-**

भारताच्या 'नेबरहूड फस्ट' या धोरणाने सध्या वेग घेतला आहे. कारण दक्षिण आशियातील श्रीलंका, बांगलादेश, भूतान आणि मालदीव या देशांमध्ये सध्या भारतीय राज्याला व धोरणाला अनुकूल असे राजकीय पक्ष व नेते सत्तेत आहेत. उदा. बांग्लादेश जमीन हस्तांतरणाचा करार, 'सागरमाला','मौसम' या परियोजनांवरून राष्ट्रीय सत्तेवर भर दिला जात असल्याचे स्पष्ट होते. देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणांच्या व्यापक एकीकरणाचा दृष्टिकोन दिसत आहे. उदा. मेक इन इंडिया, पंतप्रधान परदेश दौऱ्यांमध्ये योग, भारतात रुजलेली बौद्ध व इस्लामिक संस्कृतीची परंपरा यावर भर देतात. यावरून 'सॉफ्ट पॉवर वाढवण्याकडे कल दिसून येतो. पूर्वीच्या 'लुक ईस्ट पॉलिसी'ऐवजी ॲक्ट ईस्ट' धोरण व 'लुक वेस्ट' धोरणाचे सूतोवाच केले आहे. भारत हा जगातील सर्वाधिक ऊर्जा वापरणाऱ्या देशांपैकी आहे. परिणामी 'ऊर्जा सुरक्षा' हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा सर्वोच्च बिंदू बनला आहे. सध्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये सातत्याबरोबर बदलांची काही लक्षणे दिसत आहेत. यामध्ये व्यापाराबरोबर सुरक्षा, संस्कृती, भू-राजकीय व भू-सामरिक स्वरूपाचे विषय फार महत्त्वाचे आहेत.5)

**आर्थिक बबीकडे वाटचाल:-**

१९९० च्या दशकामध्ये सोव्हिएत रशियाचे पतन, शीतयुद्धाची समाप्ती झाली. याचवेळी भारत आर्थिक संकटातून वाटचाल करत होता. परिणामी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून अमेरिकेच्या संपर्कात यावे लागले. यानंतर भारताने एलपीजी मॉडेलचा अंगीकार करून अर्थव्यवस्था खुली केली. या घटनेमुळे भारताचे परराष्ट्र धोरण व्यूहात्मक बाबींकडून भू-आर्थिक बाबींकडे झुकले. या संरचनात्मक बदलामुळे भारताची 'परकीय मदतीकडून थेट परकीय गुंतवणुकीकडे वाटचाल सुरू झाली. याचवेळी भारताने 'पूर्वेकडे पहा' धोरणाचा (Look East Policy) अंगीकार केला. यावेळी पूर्व आशियायी देशांमध्ये वेगाने आर्थिक विकास घडून येत होता. यामुळे पर्यटन, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांना चालना देण्याचा प्रयत्न होता.यानंतर 'गुजराल सिद्धांता'च्या साहाय्याने शेजारील देशांशी देवाण-घेवाणीची अपेक्षा न करता संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होता.6)

**केंद्रातील भाजपप्रणीत सरकारचा परराष्ट्र धोरणावर भर:-**

नरेंद्र मोदींच्या नव्या मंत्रिमंडळामध्ये परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षा या विषयांशी निगडित पदांचा भार या क्षेत्रातील तज्ज्ञ नोकरशहांकडे दिला आहे. याचाच अर्थ सरकारच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण व राजनय हे महत्त्वपूर्ण विषय आहेत. मात्र या सरकारने यूपीए सरकारची धोरणे तशीच पुढे चालू ठेवली आहेत. त्यांचा कल पाश्चिमात्य राष्ट्रांकडे झुकलेला दिसतो. तसेच शेजारील देशांशी संबंधांना खूप महत्त्व दिले आहे. भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' या धोरणाने सध्या वेग घेतला आहे. कारण दक्षिण आशियातील श्रीलंका, बांगलादेश, भूतान आणि मालदीव या देशांमध्ये सध्या भारतीय राज्याला व धोरणाला अनुकूल असे राजकीय पक्ष व नेते सत्तेत आहेत. उदा. बांग्लादेश जमीन हस्तांतरणाचा करार, सागरमाला, मौसम या परियोजनांवरून राष्ट्रीय सत्तेवर

भर दिला जात असल्याचे स्पष्ट होते. देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणांच्या व्यापक एकीकरणाचा दृष्टिकोन दिसत आहे. उदा. मेक इन इंडिया, पंतप्रधान परदेश दौऱ्यामध्ये योग, भारतात रुजलेली बौद्ध व इस्लामिक संस्कृतीची परंपरा यावर भर देतात. यावरून सॉफ्ट पॉवर वाढवण्याकडे कल दिसून येतो.7)

**परिणाम**:-

जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या रेट्यात परराष्ट्र धोरणात व त्याच्या अंमलबजावणीत भारताला महत्त्वाचे बदल करावे लागले. परराष्ट्र धोरणात आर्थिक व व्यापारी राजनयाचे महत्त्व वाढले. देशांतर्गत आर्थिक बदल, विकास हे आंतरराष्ट्रीय बदल व धोरणांशी अधिक घट्ट जोडले गेले. देशातील बाजारपेठा आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडल्या गेल्यामुळे तिथे होणाऱ्या घडामोडींचा तत्काळ देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ लागला. द्विपक्षीय करारमदार तर होत राहिले. पण अनेक नव्या आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संस्था व संघटनांमुळे बहुपक्षीय राजनयाला अधिक महत्त्व आले. म्हणजेच परराष्ट्र धोरण हे अधिक गुंतागुंतीचे झाले.

**निष्कर्ष**:-

भारताच्या आर्थिक विकासात परकीय भांडवलाचे वाढते महत्त्व लक्षात घेता असे भांडवल आकर्षित करण्यासाठी परराष्ट्र धोरण वापरले जात आहे. त्या दृष्टिकोनातून पंतप्रधान व राष्ट्रपती आपल्या दौऱ्यांची आणखी करीत आहेत. हे केवळ भारतातच घडत आहे, असे नाही, तर जगातील बहुसंख्य विकसित आणि विकसनशील राष्ट्रे परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करत आहेत. ज्याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सातत्याने परराष्ट्र दौरे चालू आहेत, त्याचप्रमाणे जपानचे शिझो अॅबे, चीनचे शि जिनपिंग, रशियाचे पुतिन, अमेरिकेचे बराक ओबामा, इंग्लंडचे कॅमरून, जर्मनीच्या मार्केल सातत्याने परराष्ट्र दौरे आखत आहेत. भारतीय संघराज्याचा प्रवास सहकारात्मक संघराज्याकडून स्पर्धात्मक संघराज्याकडे होत आहे. भारतातील विविध घटकराज्यातील मुख्यमंत्री परकीय भांडवल आपल्या राज्यात आकर्षित करण्यासाठी विविध देशांचे दौरे करत आहेत. त्यासाठी संमेलने भरविली जात आहेत. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी एक प्रकारची स्पर्धा, चढाओढ राज्यांमध्ये आहे. या सर्व घडामोडींचा परिणाम भारतातील राजकारण, समाजकारण आणि सांस्कृतिक जीवनावर होत आहे. त्यामुळे परराष्ट्र धोरणाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**सन्दर्भ** :-

- https://www.orfonline.org/marathi/indias-foreign-policy-is-on-decisive-turn77372/२०२२.
- I bid.
- https://divyamarathi.bhaskar.com/news/directions-and-challenges-of-indias-foreign-policy2022.
- I bid
- लोकसत्ता शनिवार २९ जानेवारी २०२२.
- I bid